मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाची पश्चिम महाराष्ट्र विभागीय आढावा बैठक संपन्न..!

## 1 लाख वृक्षारोपण, योग दिन आणि मोदी सरकारच्या योजनांच्या प्रचाराची रणनीती निश्चित

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या पश्चिम महाराष्ट्र विभागाच्या वतीने पिंपरी-चिंचवड, पुणे उत्तर आणि मावळ जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची विभागीय आढावा बैठक बुधवारी उत्साहात पार पडली. आगामी संघटनात्मक उपक्रम, मोदी सरकारच्या जनकल्याणकारी योजनांचा प्रचार आणि पक्ष विस्तारासाठीची रणनीती या बैठकीत निश्चित करण्यात आली.




बैठकीला भाजप महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस तथा विभाग समन्वयक निरंजन डावखरे, प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, विभाग सहसंयोजक विक्रम देशमुख, अभियान प्रदेश सहसंयोजक विक्रम पाचपुते आणि जिल्हा प्रभारी भरत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे आणि पुणे उत्तर (मावळ) जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद यांनी स्वागताध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली.

'मोदी सरकारची यशस्वी वर्षे : विश्वास, विकास आणि जनकल्याण' या राज्यव्यापी अभियानांतर्गत पिंपरी-चिंचवड जिल्ह्यासाठी देण्यात आलेल्या चार महत्त्वाच्या कार्यक्रमांचे नियोजन पूर्ण झाल्याची माहिती शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी दिली.

बैठकीत मार्गदर्शन करताना प्रदेश सरचिटणीस निरंजन डावखरे म्हणाले, "राष्ट्रीय किंवा प्रादेशिक स्तरावरील कोणताही उपक्रम असो, तो प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवण्यात पिंपरी-चिंचवड शहर भाजप नेहमीच राज्यात अग्रेसर राहिले आहे. आगामी कार्यक्रमांचे नियोजन आणि SIR नोंदणीचा वेग पाहता शहर संघटनेने पुन्हा एकदा आपले अव्वल स्थान सिद्ध केले आहे."

या बैठकीला आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, माजी खासदार अमर साबळे, खासदार रणजितसिंह निंबाळकर, माजी आमदार अश्विनी जगताप, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे यांच्यासह पश्चिम महाराष्ट्र व मावळ परिसरातील पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, मंडल अध्यक्ष आणि भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन योगेश बाचलं यांनी केले, तर जिल्हा महामंत्री मधुकर बच्चे यांनी आभार प्रदर्शन केले. राष्ट्रगीताने बैठकीची सांगता झाली.

### चार प्रमुख अभियानांवर भर

**» १ लाख वृक्ष लागवडीचा संकल्प ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शहरात एकाच दिवशी किमान १५ हजार झाडे लावण्याचे नियोजन करण्यात आले असून, संपूर्ण आठवडाभरात १ लाखांहून अधिक वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचा निर्धार करण्यात आला.**

**» आंतरराष्ट्रीय योग दिनाचे भव्य आयोजन २१ जून रोजी शहरातील विविध योग संस्था, पतंजली परिवार आणि योगप्रेमींच्या सहभागातून मोठ्या प्रमाणावर योग दिन साजरा करण्यात येणार आहे.**

**» आणीबाणीच्या ५१ व्या वर्षानिमित्त कार्यक्रम २५ जून रोजी आणीबाणीच्या ५१ व्या वर्षानिमित्त मंडल स्तरावर विशेष व्याख्याने आयोजित केली जाणार आहेत. तसेच त्या काळात तुरुंगवास भोगलेल्या मिसाबंदी कार्यकर्त्यांचा गौरव करण्यात येणार आहे.**

**» ४) मोदी सरकारच्या योजनांची जनजागृती केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांवर आधारित प्रदर्शने, चित्रकला स्पर्धा आणि लाभार्थ्यांच्या अनुभवांचे व्हिडीओ तयार करून जनतेपर्यंत पोहोचवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.**

# महापालिकेत विविध अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभाराचे वाटप

## प्रशासकीय कार्यक्षमता वाढविण्यासाठी विविध विभागांतील अधिकाऱ्यांना अतिरिक्त जबाबदाऱ्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने प्रशासकीय कामकाजात अधिक सुसूत्रता, समन्वय आणि कार्यक्षमता राखण्याच्या दृष्टीने विविध विभागांतील अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभाराची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



महानगरपालिकेच्या अभिलेख कक्षाच्या प्रशासन अधिकारी उमा दरवेश यांच्याकडे स्थानिक संस्था कर विभागाच्या सहाय्यक आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाचे प्रशासन अधिकारी गोरखनाथ लिमण यांच्याकडे ब क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रीय अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. याशिवाय सामान्य प्रशासन विभागाचे कार्यालय अधीक्षक दत्ता सूर्यवंशी यांच्याकडे क्रीडा विभागाच्या प्रशासन अधिकारी पदाचा तर स्थानिक संस्था कर विभागाच्या कार्यालय अधीक्षक सरिता मारणे यांच्याकडे फ क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रशासन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या स्वाक्षरीने याबाबतचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

महानगरपालिकेच्या विविध विभागांतील कामकाज सुरळीत, गतिमान आणि परिणामकारक पद्धतीने पार पाडण्यासाठी हे अतिरिक्त कार्यभार वाटप करण्यात आले असून, त्यामुळे प्रशासकीय कार्यक्षमता वाढण्यास आणि नागरिकांना अधिक प्रभावी सेवा देण्यास मदत होणार आहे.

# आकुर्डीतील हॉटेल मॅजेस्टिकच्या अनधिकृत बांधकामावर महापालिकेचा 'हातोडा'

## महापालिकेची कारवाई; जेसीबी, पोकलेन आणि पोलीस बंदोबस्तात आरसीसी बांधकामे व पत्राशेड निष्कासित.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'अ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक १५ मधील सर्वे क्रमांक ७/१/१ब, आकुर्डी येथील हॉटेल मॅजेस्टिक परिसरातील अनधिकृत आरसीसी बांधकामे व पत्राशेड यांच्यावर आज निष्कासन कारवाई करण्यात आली.

'अ' क्षेत्रीय कार्यालयाच्या धडक कारवाई पथकामार्फत राबविण्यात आलेल्या या मोहिमेत हॉटेल मॅजेस्टिक तसेच परिसरातील अनधिकृत आरसीसी बांधकामे व पत्राशेड हटविण्यात आले. या कारवाईमध्ये एकूण सुमारे १२ हजार चौरस फूट क्षेत्रफळावरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली.



सदर कारवाई महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली 'अ' क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे यांच्या नियंत्रणाखाली पार पडली.

या कारवाईमध्ये प्रशासन अधिकारी प्रिया गोरखे, बांधकाम परवानगी विभागाचे कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत कोल्हे यांच्यासह उपअभियंते, कनिष्ठ अभियंते तसेच 'अ' क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक सहभागी होते. याशिवाय निगडी पोलीस ठाण्याचे २० पोलीस कर्मचारी, महापालिकेच्या अतिक्रमण विभागातील २० कर्मचारी, 'अ', 'क' व 'फ' क्षेत्रीय कार्यालयांतील महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान, महापालिका मजूर यांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेसाठी ३ जेसीबी, १ पोकलेन यंत्र, १५ मजुर तसेच आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामग्रीच्या सहाय्याने अनधिकृत बांधकामांचे निष्कासन यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले.

> पिंपरी चिंचवड शहराच्या नियोजित आणि शाश्वत विकासासाठी अनधिकृत बांधकामांवर प्रभावी कारवाई करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय उभारण्यात आलेली बांधकामे नियमबाह्य असून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसह शहराच्या विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अशा कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहतील. नागरिकांनी बांधकाम करताना सर्व आवश्यक परवानग्या घेऊन नियमांचे पालन करावे.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# पिंपरी-चिंचवड महापालिकेची दमदार वसुली; 2 महिन्यांत 280 कोटी मालमत्ताकर जमा

## वाकड विभाग अव्वल; 2.71 लाख नागरिकांकडून कर भरणा, ऑनलाईनला मोठा प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करसंकलन विभागात दोन महिन्यांत मालमत्ताकरापोटी एकूण 280 कोटी रुपये जमा झाले आहेत. एकूण 2 लाख 71 हजार 5 जणांनी मालमत्ताकराचे बिल भरले आहे. त्यात सर्वाधिक 40 कोटी रुपयांचा भरणा वाकड विभागीय कार्यालयात झाला आहे.

शहरामध्ये निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र वापराच्या तसेच, मोकळ्या जागांसह एकूण 7 लाख 44 हजार 630 नोंदणीकृत मालमत्ता आहेत. महापालिकेकडून महिलांच्या नावावरील मालमत्ता, दिव्यांग नागरिक, पर्यावरणपूरक हाऊसिंग सोसायट्यांना विविध सवलती देण्यात येत आहेत. 30 जून 2026 पूर्वी मालमत्ताकर भरणाऱ्या नागरिकांसाठी विविध सवलती दिल्या जातात. तसेच, ऑनलाइन कर भरल्यास 10 टक्के सवलत देण्यात येते. यामुळे शहरवासीयांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.



सन 2026-27 या चालू आर्थिक वर्षात 1 एप्रिल ते 31 मे या दोन महिन्यांत 2 लाख 71 हजार 5 नागरिकांनी मालमत्ताकराची बिले भरली आहेत. ती एकूण रक्कम 280 कोटी 24 लाख 65 हजार 721 रुपये आहे. त्यात सर्वाधिक 192 कोटी रुपयांचा भरणा हा निवासी मालमत्ताधारकांनी केला आहे. बिगरनिवासी मालमत्ताधारकांनी 53 कोटी 87 लाख रुपये, मिश्र मालमत्ताधारकांनी 16 कोटी आणि मोकळा जागा व इतर मालमत्ताधारकांनी 19 कोटी रुपयांचा भरणा केला आहे. बिल जमा करून नागरिक सवलतीचा लाभ घेत आहेत.

ऑनलाईन मालमत्ताकर भरण्यास नागरिक प्राधान्य देत आहेत. घरबसल्या तसेच, कामाच्या ठिकाणाहून मोबाईलद्वारे मालमत्ताकराचे बिल भरले जात आहेत. तब्बल 2 लाख 43 हजार 201 जणांनी एकूण 257 कोटी 91 लाख 61 हजार 90 रुपये ऑनलाईन माध्यमातून जमा केले आहेत. दिवसेंदिवस ऑनलाईन माध्यमातून बिल भरण्यास मोठी पसंती दिली जात आहे.

वाकड विभागीय कार्यालयात सर्वाधिक 40 कोटी रुपयांचा भरणा केला गेला आहे. थेरगाव विभागात 25 कोटी 21 लाख, सांगवी विभागात 19 कोटी 98 लाख, पिंपरीगाव विभागात 19 कोटी 68 लाख, चिंचवड विभागात 19 कोटी 41 लाख, पिंपरी कॅम्प विभागात 14 कोटी 61 लाख आणि महापालिका भवन विभागात 12 कोटी 48 लाख रुपयांचा भरणा करण्यात आला आहे.

### डिजिटल करभरणीला नागरिकांची पसंती

» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मालमत्ताकर वसुलीत यंदा ऑनलाइन करभरणीला नागरिकांनी मोठी पसंती दिल्याचे चित्र दिसून आले आहे. एप्रिल आणि मे या दोन महिन्यांत तब्बल 2 लाख 43 हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी ऑनलाइन माध्यमातून 257 कोटी रुपयांपेक्षा जास्त कर भरला. महापालिकेकडून देण्यात येणाऱ्या सवलती, घरबसल्या कर भरण्याची सुविधा आणि सोपी डिजिटल प्रक्रिया यामुळे नागरिकांचा प्रतिसाद वाढला आहे. करसंकलनात वाकड विभाग अव्वल ठरला असून, एकट्या या विभागातून 40 कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. यामुळे महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नाला मोठी चालना मिळाली आहे.

> ऑनलाईन बिल भरल्यास तसेच, 30 जूनपर्यंत बिल जमा केल्यास सामान्यकरात 10 टक्के सलवत दिली जाते. त्याचा लाभ नागरिक मोठ्या संख्येने घेत आहेत. नागरिकांनी तातडीने मालमत्ताकराचे बिल भरून महापालिकेस सहकार्य करावे. थकबाकीदारावर मालमत्ता जप्तीची कारवाई सुरू आहे.
>
> **- सचिन पवार, उपायुक्त, महापालिका**

# पुण्यात जनगणना कामात दिरंगाई, सहाय्यक आयुक्तांवर थेट निलंबनाची कारवाई!

## महापालिकेच्या येरवडा-वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाचे प्रभारी सहाय्यक आयुक्त राजेश गुर्रम यांना थेट निलंबित करण्यात आले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

जनगणनेच्या कामात निष्काळजीपणा दाखविल्याने महापालिकेच्या येरवडा -वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाचे प्रभारी सहाय्यक आयुक्त राजेश गुर्रम यांना निलंबित करण्यात आले आहे. अतिरिक्त महापालिका आयुक्त प्रजित नायर यांनी ही कारवाई केली. जनगणनेच्या कामात यापुढील काळात हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कारवाई होणार असल्याचे नायर यांनी सांगितले.

महापालिकेच्या येरवडा-वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील जनगणनेच्या कामकाजासाठी प्रभारी सहाय्यक आयुक्त राजेश राजेश गुर्रम यांची 'जनगणना अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई येथील जनगणना संचालनालयाच्या परिपत्रकांनुसार हे कामकाज कालबद्ध मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक होते. यामध्ये 'सीएमएमएस पोर्टल'वर प्रगणक आणि पर्यवेक्षकांच्या नोंदी करणे, नियुक्ती पत्रे देणे, घरयादी गट तयार करून त्यांना प्रशिक्षण देणे आणि दैनंदिन कामाचा आढावा घेणे, अशा जबाबदाऱ्या गुर्रम यांच्याकडे होत्या.

गुर्रम यांनी उपलब्ध मनुष्यबळाचे आवश्यक असलेले नियोजन न केल्यामुळे या क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सुरू असलेले जनगणनेचे काम रखडले. महापालिका आयुक्त आणि अतिरिक्त महापालिका आयुक्तांनी वेळोवेळी घेतलेल्या आढावा बैठकांमध्ये गुर्रम यांना कामाचा वेग वाढवण्याचे आदेश दिले. मात्र, त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल करत कामात टाळाटाळ केली आणि वेळेत काम पूर्ण करण्याच्या आदेशाला हरताळ फासला, असा ठपका त्यांच्यावर ठेवून अतिरिक्त आयुक्त नायर यांनी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आणि खातेनिहाय चौकशी करण्याचे आदेश काढले आहेत.




### वेळेत जनगणना पूर्ण करण्यावर भर

**» केंद्र सरकारच्या निर्देशानुसार जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यात घरयादी तयार करण्याचे काम सुरू आहे. या प्रक्रियेत प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाची महत्त्वाची भूमिका असून काम कालबद्ध मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक आहे. महापालिका आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्त नियमित आढावा बैठका घेऊन कामाची प्रगती तपासत आहेत. जनगणना प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. अचूक माहिती संकलन आणि वेळेत काम पूर्ण करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना जबाबदारीने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.**

### निष्काळजीपणावर प्रशासनाचा बडगा

**» पुणे महापालिकेने जनगणना २०२७ च्या कामात झालेल्या हलगर्जीपणाची गंभीर दखल घेत येरवडा-वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाचे प्रभारी सहाय्यक आयुक्त राजेश गुर्रम यांना निलंबित केले आहे. जनगणनेच्या कामाचे नियोजन, प्रगणकांच्या नियुक्त्या, प्रशिक्षण आणि दैनंदिन आढावा यामध्ये झालेल्या दिरंगाईमुळे ही कारवाई करण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून काम रखडल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. या कारवाईमुळे जनगणना प्रक्रियेत जबाबदारी आणि शिस्तीचे महत्त्व अधोरेखित झाले असून प्रशासनाने भविष्यातही अशा प्रकारच्या निष्काळजीपणावर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.**

### प्रगणकांनाही कारवाईचा इशारा

**» महापालिकेने जनगणना २०२७ साठी शिक्षकांसह विविध विभागांतील कर्मचाऱ्यांची प्रगणक म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांना आवश्यक प्रशिक्षण आणि जनगणना किटही वितरित करण्यात आले आहे. मात्र, प्रशिक्षण घेतल्यानंतरही काही प्रगणक कामावर हजर राहत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांनी तातडीने कामावर रुजू व्हावे, अन्यथा त्यांच्यावर जनगणना कायदा १९४८ अंतर्गत शिस्तभंगाची तसेच फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. जनगणना ही राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाची प्रक्रिया असल्याने प्रत्येक कर्मचाऱ्याने जबाबदारीने काम करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाचे मत आहे.**

# कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणाला वेग; जागा न देणाऱ्यांवर सक्तीच्या भूसंपादनाची कारवाई

## वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेची कडक भूमिका; अतिक्रमण हटविण्याचीही तयारी

**पुणे | प्रतिनिधी**

शहराच्या दक्षिण भागातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरण प्रकल्पाला गती देण्यासाठी महापालिका प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. रस्त्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्यास टाळाटाळ करणाऱ्या मालमत्ताधारकांविरुद्ध सक्तीच्या भूसंपादनाची प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, ताब्यात आलेल्या जागांवरील अतिक्रमणांवरही लवकरच कारवाई करण्यात येणार आहे

कात्रज ते कोंढवा हा मार्ग शहरातील सर्वाधिक रहदारी असलेल्या रस्त्यांपैकी एक मानला जातो. वाढती लोकवस्ती, व्यावसायिक आस्थापना आणि वाहनांची वाढती संख्या यामुळे या मार्गावर दिवसभर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असते. रस्तारुंदीकरणाचा प्रकल्प अनेक वर्षांपासून चर्चेत असला तरी जमीन संपादन आणि अतिक्रमणांच्या प्रश्नांमुळे त्याची अंमलबजावणी संथगतीने सुरू होती

महापालिकेने आतापर्यंत अनेक मालमत्ताधारकांकडून आवश्यक जागा ताब्यात घेतली आहे. या जागांवर रस्त्याच्या कामात अडथळा ठरणारी अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे हटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. याशिवाय, अद्याप जागा हस्तांतरित न करणाऱ्या मालकांविरुद्ध संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार सक्तीचे भूसंपादन करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

यापूर्वी संबंधित मालकांना जागा स्वेच्छेने देण्यासाठी वारंवार आवाहन केले होते. मात्र, काही ठिकाणी अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने प्रशासनाने आता कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे.



### रस्ता रुंदीकरणाला वेग

**» पुण्याच्या दक्षिण भागातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वाचा ठरणारा कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरण प्रकल्प आता निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे. प्रकल्पासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यास टाळाटाळ करणाऱ्या मालमत्ताधारकांविरोधात महापालिकेने सक्तीच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच ताब्यात आलेल्या जागांवरील अतिक्रमणे हटविण्याची कारवाईही लवकरच करण्यात येणार आहे. अनेक वर्षांपासून रखडलेल्या या प्रकल्पामुळे कात्रज, कोंढवा, खडी मशिन चौक परिसरातील वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल अपेक्षित असून हजारो वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे.**

# पावणेदोन लाख नागरिकांची टँकरवर भिस्त; पुणे जिल्ह्यात 104 टँकरद्वारे पाणीपुरवठा

## आंबेगाव, जुन्नर, खेड, शिरूर आणि पुरंदर तालुक्यांत सर्वाधिक संकट; 87 विहिरी संपादित, नवीन बोअरवेलना मंजुरी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील पाणीटंचाईच्या झळा तीव्र होण्यास सुरुवात झाली असून, एकूण १०४ टँकरद्वारे १११ गावे आणि ४२६ वाड्यांतील सुमारे पावणेदोन लाख लोकसंख्येला पाणीपुरवठा केला जात आहे. आंबेगाव, जुन्नर, खेड, शिरूर आणि पुरंदर तालुक्यात सर्वाधिक पाणीटंचाई असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. दरम्यान, 'एल-निनो'च्या प्रभावामुळे पावसाचे आगमन उशिरा झाल्यास टँकरची संख्याही वाढण्याची शक्यता असून, जिल्हा प्रशासनाकडून ८७ विहिरींचे संपादन करण्यात आले आहे.




जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर, खेड, शिरूर आणि पुरंदर या तालुक्यांतील १११ गावे आणि ४२६ वाड्यांमध्ये पाणीटंचाई भासत असून, एकूण नऊ तालुक्यांतील १ लाख ७३ हजार ५२९ नागरिकांना गेल्या आठवड्यापर्यंत १०४ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. ही संख्या काही प्रमाणात वाढली असून, ती पावणेदोन लाखांपर्यंत पोहोचल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. तसेच, ३०३० पशुधनाला ही टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्ती आणि देखभालीच्या कामांनाही वेग देण्यात आला आहे. त्यासाठी ४३ पाणीपुरवठा योजना दुरुस्ती कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून, पाच कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

'ग्रामीण भागात पाणीपुरवठ्यासाठी २.५६ कोटी रुपयांचा खर्च करून ६११ कूपनलिकांच्या (बोअरवेल) दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. ग्रामीण भागातील वाढती पाणीटंचाई लक्षात घेऊन ३१ नवीन कूपनलिकांच्या कामांनाही मंजुरी देण्यात आली आहे. त्यासाठी २५.३५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

### एल-निनोचा परिणाम; प्रशासन सतर्क

**» यंदा 'एल-निनो'च्या प्रभावामुळे मान्सून उशिरा येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने आतापासूनच पर्यायी उपाययोजना सुरू केल्या आहेत. पुणे जिल्ह्यात ८७ विहिरी संपादित करण्यात आल्या असून विभागातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये मिळून २०० टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी १६८ विहिरी आणि कूपनलिका अधिग्रहीत करण्यात आल्या आहेत. परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.**

### पाणीटंचाईची झळ १११ गावांना

**» पुणे जिल्ह्यातील पाणीटंचाई दिवसेंदिवस गंभीर होत असून १११ गावे आणि ४२६ वाड्या-वस्त्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. आंबेगाव, जुन्नर, खेड, शिरूर आणि पुरंदर या तालुक्यांमध्ये परिस्थिती अधिक गंभीर आहे. सध्या १०४ टँकरद्वारे सुमारे पावणेदोन लाख नागरिकांची तहान भागवली जात आहे. याशिवाय तीन हजारांहून अधिक पशुधनालाही टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवले जात आहे. पावसाचे आगमन लांबल्यास टँकरची संख्या आणखी वाढण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.**

### दुरुस्ती कामांना गती, निधी मंजूर

**» वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्ती आणि देखभाल कामांना गती दिली आहे. ४३ पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तीसाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच ६११ कूपनलिकांच्या दुरुस्तीसाठी २.५६ कोटी रुपये खर्च केले जात आहेत. ग्रामीण भागातील वाढती गरज लक्षात घेऊन ३१ नवीन कूपनलिकांच्या कामांनाही मंजुरी देण्यात आली असून त्यासाठी २५.३५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.**

# पुणे-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरला गती! द्रुतगती मार्गावर 'एमआयडीसी'चे मोठे पाऊल

## द्रुतगती मार्गाभोवती मावळ तालुक्यात नवीन 'एमआयडीसी' उभारण्यात येणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे ते मुंबई द्रुतगती मार्गावर औद्योगिक पट्टा विकसित करण्याचे पहिले पाऊल आता पडले आहे. द्रुतगती मार्गाभोवती मावळ तालुक्यात नवीन 'एमआयडीसी' उभारण्यात येणार आहे. बऊरसह तीन गावांमध्ये या 'एमआयडीसी'साठी सर्वेक्षण आणि मोजणी पूर्ण झाली आहे. आता भूसंपादन प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.



बऊर, करंज आणि ब्राह्मणवाडी या तीन गावांच्या परिसरात सुमारे ११०० एकरांवर 'एमआयडीसी' उभारली जाईल. विशेष म्हणजे द्रुतगती मार्गाच्या दोन्ही बाजूंना 'एमआयडीसी' असेल. द्रुतगती मार्गाभोवतीच्या कोरडवाहू जमिनीची यासाठी निवड करण्यात आली आहे. उद्योग विभागाने २००७ मध्ये बऊर 'एमआयडीसी'ची जागा अधिसूचित केली होती. त्यानंतर २०१७ मध्ये या परिसरातील जमिनींच्या खरेदी-विक्रीस मनाई करण्याची सूचना काढण्यात आली. या 'एमआयडीसी'साठी जमिनीचे सर्वेक्षण आणि मोजणी पूर्ण झाली आहे. आता भूसंपादन प्रक्रिया सुरू झाली आहे.

> बऊर 'एमआयडीसी'साठी जागेचे सर्वेक्षण आणि मोजणीचे काम पूर्ण झाले आहे. भूसंपादनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यानंतर याबाबत संयुक्त बैठकही झाली आहे. भूसंपादनाची प्रक्रिया लवकरच सुरू होईल.
>
> **- संतोष भिसे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, 'एमआयडीसी'**

'एमआयडीसी'कडून भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठविण्यात आला होता. त्यावर जिल्हाधिकारी कार्यालयात २२ मे रोजी बऊर एमआयडीसी क्षेत्रातील शेतकऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत जमिनीच्या दरनिश्चितीबाबत प्राथमिक चर्चा करण्यात आली. मात्र, अंतिम निर्णय झाला नसून, लवकरच पुढील बैठक होणार आहे. या बैठकीला मावळचे आमदार सुनील शेळके, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, 'एमआयडीसी'चे प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते, अशी माहिती सूत्रांनी दिली.